MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : ३ पाने : ८ एप्रिल-मे २०२३ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

महापारेषण ही देशातील सर्वात मोठी राज्य पारेषण कंपनी आहे. मे २०२३ पर्यंत महापारेषण कंपनीत ७२८ उपकेंद्रे, १,३६,६९८ एम.व्ही.ए. परिवर्तन क्षमता व ५०,६३१ सर्किट किलोमीटर अति उच्च दाब पारेषण वाहिन्या कार्यान्वित आहेत. या पायाभूत सुविधांमध्ये राज्यातील बहुतांश आंतर-प्रादेशिक आणि आंतर-प्रादेशिक वीज पारेषण प्रणालीचा समावेश आहे. एच.व्ही.डी.सी. वाहिन्यांची मालकी असणारी राज्य क्षेत्रातील एकमेव वीज पारेषण कंपनी असण्याचा मान महापारेषणला आहे. महापारेषणने अखंड सेवा सुनिश्चित करण्यासाठी विविध तांत्रिक सुधारणा आणि ऑटोमेशन उपायांचा अवलंब केला आहे.

- **आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा**
- **MTAMC चे काम चांगले**
- **पारेषण प्रणालीचे नियोजन करा**
- **ड्रोनमुळे कामात सुधारणा**

महापारेषणने डिजिटल उपकेंद्रे व डिजिटल बे, एम.टी.ए.एम.सी., ए.एम.आर., ओ.पी.जी.डब्ल्यू, एच.टी.एल.एस., मोनोपोल मनोरे व ड्रोन यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. डिजिटल उपकेंद्रांमुळे केबलची गरज कमी होते. कमी जागेची आवश्यकता असते आणि संचलनाचा खर्च कमी राखण्यासोबत सुरक्षितता वाढते. राजूर आणि चांदवड येथे मानवरहित दुर्नियंत्रित उपकेंद्रे कार्यरत आहेत. महापारेषणने गॅस इन्सुलेटेड स्विचगियर (GIS) उपकेंद्रे देखील उभारली आहेत. भांडूप, रास्ता पेठ येथे जी.आय.एस. उपकेंद्रे कार्यान्वित झाली आहेत. तर ४०० के.व्ही. हिंजवडी उपकेंद्र प्रगतिपथावर आहे. याशिवाय, इलेक्ट्रिकल रिसर्च अँड डेव्हलपमेंट असोसिएशन (ERDA) व्दारे ट्रान्सफॉर्मर हेल्थ मॉनिटरिंग, रेसिड्यूअल लाइफ असेसमेंट आणि थर्ड-पार्टी ट्रान्सफॉर्मर टेस्टिंग करण्यात येत आहे. वहिवाट हक्क (राईट-ऑफ-वे) समस्यांचे निवारण करण्यासाठी, महापारेषणने कॉम्पॅक्ट टॉवर डिझाईन, मोनोपोल मनोरे, एच.टी.एल.एस. कंडक्टर यासह इतर उपाययोजनांचा अवलंब केला आहे. महापारेषणने BHUVAN प्लॅटफॉर्म वापरून राष्ट्रीय रिमोट सेन्सिंग सेंटर, नागपूर, ISRO च्या सहकार्याने वेब-आधारित भौगोलिक माहिती प्रणाली देखील विकसित केली आहे. ज्यामध्ये प्रभावी नियोजनासाठी अति उच्च दाब उपकेंद्रांसह २२० के. व्ही. स्तरापर्यंतच्या सर्व पारेषण मालमत्तेचे मॅपिंग केले आहे.

महापारेषण कंपनीच्या पारेषण प्रणालीचे दूरनियंत्रित केंद्रीकृत संचलन, देखरेख आणि सक्षम नियंत्रणासाठी संबंधित दूरसंचार प्रणालीसह महाराष्ट्र ट्रान्समिशन ऍसेट मॅनेजमेंट सेंटर (MTAMC) स्थापित केले आहे. महापारेषणने २२ उपकेंद्रांच्या ऑटोमेशन स्थापन करण्याची योजना आखली आहे. ज्यांचे OPGW कनेक्टिव्हिटीच्या माध्यमाने कंट्रोल सेंटरव्दारे अति उच्च दाब उपकेंद्रांचे परीक्षण आणि नियंत्रण केले जाते. ऐरोली येथील नियंत्रण केंद्राव्दारे महापारेषणच्या उपकेंद्रांचे केंद्रीकृत निरीक्षण आणि नियंत्रण करण्यास मदत करेल. तसेच याव्दारे रिमोट प्रोटेक्शन मॅनेजमेंट आणि रिले पॅरामीटरायझेशन (आर.ए.एस.) ऑटोमॅटिक डीआर फेचिंग अँड ऍनालिसीस (ए.एफ.ए.एस.), व्ही.एम.एस. आणि पी.आय.डी.एस. व्दारे उपकेंद्रांचे व्हिडिओ निरीक्षण, ट्रान्सफॉर्मर मॉनिटरिंग सिस्टिम (टीएमएस-ऑनलाईन बुशिंग मॉनिटरिंग, ऑनलाईन डीजीए, ऑक्झिलरी प्रणाली) तसेच कॉर्पोरेट डेटा वेअरहाऊस सिस्टीम (CDWS) स्थापन करण्यास मदत होणार आहे.

आपण ६१,८५० प्रोटोकॉलवर सबस्टेशन डेटा एकत्रित केला आहे. १०४ प्रोटोकॉलवर नियंत्रण केंद्राला OPGW, VSAT इत्यादी संप्रेषण माध्यमांव्दारे पाठविले आहे. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला (MSLDC) सुरक्षित, विश्वासार्ह आणि आर्थिक रितीने राज्य पारेषण प्रणालीचे नियोजन बांधणे, ऑपरेट करणे आणि देखभाल करणे सुलभ करण्यासाठी डेटा संपादन उपकरणे, अलीकडील तंत्रे आणि नवीनतम तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. त्यामुळे प्रणाली निरीक्षण आणि नियंत्रण तसेच ऑपरेशनल कार्यक्षमतेत सुधारणा झाली आहे.

महापारेषण संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेल्या विशाल अति उच्च दाब प्रणालीचे संचलन आणि देखभाल करीत आहे. एवढ्या मोठ्या अति उच्च दाब प्रणालीच्या सुरळीत संचलनासाठी आणि पारेषण प्रणालीची उपलब्धता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी, महापारेषणकडे प्रणालीमधील समस्यांच्या घटना कमी करण्यासाठी आवश्यक पूर्वसूचना देणारी साधने आहेत. अति उच्च दाब वाहिन्या/उपकेंद्रांची जवळून तपासणी करण्यासाठी कंडक्टर/इन्सुलेटर्स, गहाळ/खराब झालेले हार्डवेअर, कंडक्टर किंवा ग्राउंड वायरचे नुकसान, हॉटस्पॉट इत्यादींचे निरीक्षण करण्यासाठी महापारेषण कंपनीने २४ रिमोट एअरबोर्न इन्स्पेक्शन अँड स्कॅनिंग सिस्टम्स (रिमोट कंट्रोल्ड ड्रोन) तैनात केले आहेत.



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

घटना टाळण्यासाठी आणि अतिसंवेदनशील व्हिज्युअल्स कॅमेरे तसेच जीपीएससह कोणत्याही संभाव्य दोष/उणीवा आणि ROW मधील उल्लंघन/अतिक्रमण समस्यांचे अचूक निरीक्षण करण्यासाठी व रिमोट कंट्रोल ड्रोनमध्ये विद्युत प्रणालीवरील हॉटस्पॉट ओळखण्यास मदत करण्यासाठी या ड्रोनमध्ये पूर्व-स्थापित थर्मोव्हिजन कॅमेरा आहेत. अंदाजात्मक देखभाल आणि उपचारात्मक कृतींच्या माध्यमातून डाऊनटाईम/लाइन ब्रेकडाऊन कमी करून, स्थिरता, उपलब्धता आणि विश्वासार्हता याव्दारे वाढेल. शिवाय, याचा फायदा महापारेषणला दर्जेदार वीज पुरविण्यासाठी झाला आहे. अशा प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान वापरून महापारेषण कंपनी सातत्याने चांगली कामगिरी करीत आहे. भविष्यातही, आपण सांघिक काम (Team Work) करून महापारेषणचे नाव नक्कीच उंचवाल, अशी खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

▶ गृह मंत्रालयाचे प्रधान सचिव म्हणून श्री. दिनेश वाघमारे यांची बदली

# महापारेषणच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी डॉ. संजीव कुमार रुजू

Follow us on :

*महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) हे दि. ०३.०५.२०२३ रोजी रुजू झाले. ते २००३ च्या तुकडीचे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्यांनी श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्याकडून पदभार घेतला.*

*श्री. दिनेश वाघमारे यांची प्रधान सचिव, गृह मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे नियुक्ती झाली आहे. महापारेषणमध्ये रुजू होण्यापूर्वी डॉ. संजीव कुमार हे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासन म्हणून कार्यरत होते.*

*डॉ. संजीव कुमार हे जम्मू वैद्यकीय महाविद्यालयाचे पदवीधर आहेत. त्यांनी लंडनच्या किंग्ज महाविद्यालयातून सार्वजनिक धोरण आणि व्यवस्थापन या विषयात पदव्यूत्तर शिक्षण घेतले आहे. त्यांना व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील २० वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. त्यांना संघबांधणी, प्रकल्प नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन यांचा मोठा अनुभव आहे.*



**डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव, गृह मंत्रालय

▶ उपकेंद्रांची पाहणी करून केल्या अधिकाऱ्यांना सूचना

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांची पडघे येथे भेट

Follow us on :

महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी एच.व्ही.डी.सी. पडघे येथे भेट देऊन कामांची पाहणी केली. या भेटी दरम्यान, अंजुर इलेक्ट्रोड सेंटर, ५०० के. व्ही. एच.व्ही.डी.सी. पडघे व ४०० के. व्ही. पडघे उपकेंद्रांची पाहणी करून अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्या.

या भेटीत त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधला. स्वच्छता व उपकरणाची निगा राखण्याबाबत समाधान व्यक्त केले. या वेळी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता श्री. राम कोल्हे, कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर, श्री. दीपक पाटील, मुब्बाशीर सय्यद, दिलीप रनबावले, रवींद्र गुधाटे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

**थेट-भेट**



**पडघे :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी एच.व्ही.डी.सी. पडघे येथे भेट देऊन कामांची पाहणी केली. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, अधीक्षक अभियंता श्री. राम कोल्हे, कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर व अन्य अधिकारी.

**Team Work**



**पडघे :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी एच.व्ही.डी.सी. पडघे येथे भेट देऊन कामांची पाहणी केली. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी.

## महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कामगिरी

# १३२ के. व्ही. वरसगाव उपकेंद्रात बदलले आठ CT विक्रमी वेळेत!



Follow us on :

पुणे परिमंडळातील अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था मंडळ, पुणे अंतर्गत अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग-२, पुणेमधील १३२ के. व्ही. वरसगाव उपकेंद्रामधील एकूण आठ १३२ के. व्ही. Current Transformer (CT) च्या Tan Delta Values स्विकार्य प्रमाणापेक्षा अधिक असल्यामुळे तातडीने बदलण्यात आले. हे काम अवघ्या साडेनऊ तासात विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले.

वरसगाव येथे महानिर्मितीचे दोन उपकेंद्र व महावितरणचे दोन उपकेंद्र आहेत. १३२ के. व्ही. रहाटणी-वरसगाव हा वाहिनीचा एकमेव स्त्रोत असल्यामुळे इतर विभागांशी समन्वय साधून हे जिकिरीचे काम विहित वेळेत पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे या कामासाठी कोणतीही बाह्यस्त्रोत कंपनी किंवा कंत्राटदाराची मदत न घेता महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे काम वेळेत पूर्ण केले.

हे जिकिरीचे काम अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग-२ च्या कार्यकारी अभियंता श्रीमती पूनम राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली १३२ के. व्ही. उपकेंद्र वरसगावचे उपकार्यकारी अभियंता श्री. अजय नाल्हे, उपकेंद्र देखभाल पथक, चिंचवडचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. संजय ढवळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती निवेदिता कुलकर्णी, चाचणी विभाग, पुणेचे उपकार्यकारी अभियंता श्री. आशिष डाखरे यांनी पार पाडले.

या कामाबद्दल पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड व अधीक्षक अभियंता श्री. प्रमोद भोसले यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे एप्रिल - मे २०२३

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजय आवारे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, कळवा | १३.०४.२०२३ |
| २. | श्री. गिरीश पंतोजी | अधीक्षक अभियंता (पारेषण) | राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | १२.०४.२०२३ |
| ३. | श्री. राम शेळके | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, सोलापूर | १२.०४.२०२३ |
| ४. | श्री. राजन जोशी | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, नागपूर | १७.०४.२०२३ |
| ५. | श्री. विशाल वाघचौरे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | १७.०४.२०२३ |
| ६. | श्री. उमेश भगत | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | १३.०४.२०२३ |
| ७. | श्रीमती अंजना ठक्कर | अधीक्षक अभियंता (पारेषण) | राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | २५.०४.२०२३ |
| ८. | श्रीमती प्रणोती देशमुख | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प मंडळ, अमरावती | १२.०४.२०२३ |
| ९. | श्रीमती वैशाली पाझरे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अंबाझरी भार प्रेषण केंद्र, अंबाझरी | १७.०४.२०२३ |
| १०. | श्री. अशोक मडावी | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, चंद्रपूर | ०८.०५.२०२३ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अतुल मनुरकर | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | स्थापत्य मंडळ, कोल्हापूर | ३१.०५.२०२३ |
| २. | श्रीमती बिना खोत | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०५.२०२३ |



# डॉ. बाबासाहेबांचे विद्युत क्षेत्रातील योगदान

## जयंती



**अंकुर कावळे**

स्वातंत्र्यापूर्वी सन १८८० च्या सुमारास भारतामध्ये वीज आली. सुरुवातीच्या त्या काळात विजेच्या नियोजनासंबंधीची राष्ट्रीय पातळीवर कुठलीही संस्था अथवा धोरण अस्तित्वात नव्हते. सन १९०५ मध्ये केंद्र सरकारने पत्राव्दारे प्रांतांना विजेसंबंधी प्रगत होण्याची गरज कळविली. अर्थात, त्यानंतरही बरीच वर्षे लोटली, पण फारशी प्रगती झाली नाही. १९१८ मध्ये ज्यावेळी औद्योगिक आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. त्यावेळेपासून राष्ट्रीय व प्रांतीय सरकार विजेसंबंधी रस घेऊ लागली. औद्योगिक आयोगाने त्यावेळच्या सरकारांना भारतात हायड्रोग्राफिक सर्व्हे करण्याची सूचना केली. ती सूचना मान्य करण्यात आली व त्यानंतर १९१९ ते १९२२ दरम्यान पाण्यापासून वीज तयार करण्याच्या शक्यतांसंबंधी तीन अहवाल प्रसिध्द झाले. अर्थात, पुन्हा हे सर्व्हे व अहवाल कुचकामी ठरले. कारण १९१९ च्या कायद्यानुसार वीज हा प्रांतांचा विषय व जबाबदारी झाली आणि केंद्राला केवळ बघ्याची भूमिका घ्यावी लागली.

**१९४२ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा विद्युत विभागाची धुरा हाती घेतली. त्यावेळी संपूर्ण भारतभर विद्युत क्षेत्राची कुठलीही पायाभूत माहिती उपलब्ध नव्हती; तसेच कोणतेही ध्येयधोरणही अस्तित्वात नव्हते. अशा परिस्थितीत विद्युत क्षेत्राची घडी बसविण्याची अत्यंत कठीण जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर होती.**

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात दारूगोळा व लष्करी साहित्य बनवण्याच्या उद्योगांना तत्काळ विजेची गरज निर्माण झाली. त्यानुसार भारत सरकारने १९४१ मध्ये विद्युत आयोगाची स्थापना केली. १९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा विद्युत विभागाची धुरा हाती घेतली, त्यावेळी संपूर्ण भारतभर विद्युत क्षेत्राची कुठलीही पायाभूत माहिती उपलब्ध नव्हती तसेच कोणतेही ध्येयधोरणही अस्तित्वात नव्हते. अशा परिस्थितीत विद्युत क्षेत्राची घडी बसविण्याची अत्यंत कठीण जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर होती.

विद्युत क्षेत्रातील प्रगतीच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल म्हणजे १९४३ मधील पॉलिसी कमिटीची स्थापना. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष असलेल्या या कमिटीचे मुख्य ध्येय हे वीजनिर्मिती, पारेषण व वितरण यामधील असलेल्या अडचणींचा अभ्यास करणे, त्यामध्ये असलेले दोष दूर करणे व त्यासाठी सरकारला योग्य



## विशेष

ते मार्गदर्शन करणे इ. होते. या पॉलिसी कमिटीच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांनी विजक्षेत्राचा मेहनतीने अतिशय सखोल असा अभ्यास केला. कमिटीच्या दोन वर्षांच्या सखोल अभ्यासानंतर वेगवेगळ्या स्तरांवरील परिषदा, चर्चासत्रे आदी बाबींमुळे नवीन विद्युत पॉलिसी निर्माण झाली आणि भारताच्या विद्युत क्षेत्रातील जडणघडणीतला पाया रोवला गेला. विद्युत पॉलिसी आणि पॉलिसी कमिटीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांनी अनेक विषय हाताळले.

### विद्युत क्षेत्र कुणाच्या हातात?

भारतीय विद्युत कायदा १९१० नुसार भारतात विविध खासगी व्यावसायिकांकडे काही शहरांमध्ये वीजनिर्मिती व वितरणाचे परवाने होते. त्यामुळे वीज अगदी मोजक्या लोकांपर्यंत मर्यादित होती. वीज सर्वांपर्यंत पोहोचावी व ती परवडणाऱ्या किमतीत असावी, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा होती. त्यामुळे विद्युत क्षेत्राचा भारतभर विस्तार व्हावा, या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी नवीन विद्युत पॉलिसीत खूप अभ्यासांती मते मांडलीत. वीज क्षेत्राची मुख्य जबाबदारी प्रांतांना दिलीच; पण केंद्राचाही अधिकार व जबाबदारी यांची योग्य ती मांडणी केली गेली. नवीन विद्युत पॉवर पॉलिसीचा आणखी एक पैलू म्हणजे केंद्रीय तांत्रिक शक्ती बोर्डाची स्थापना. या बोर्डाची स्थापना करताना डॉ. आंबेडकरांनी अपेक्षा व्यक्त केली की, सी.ई.ए. हे सशक्त तांत्रिक संघटन व्हावे व त्यांनी भारतीय विद्युत क्षेत्रातील वेगवेगळ्या गोष्टींचा अभ्यास करावा, सर्व्हे करावा, डॉक्युमेंटेशन करावे, योजना बनवाव्या आणि सरकारला तांत्रिक सल्ला द्यावा, जेणेकरून वीज क्षेत्रात भरीव प्रगती साधता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अखत्यारीत असलेल्या कामगार विभागाने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. पहिला म्हणजे भारतीय अभियंत्यांना परदेशात विद्युत तंत्रज्ञानाबद्दल प्रशिक्षण देणे आणि दुसरे असे की, विद्युत क्षेत्रासाठी लागणारी मशिनरी भारतात बनवण्यासाठी पावले उचलली. कामगार विभागाने पुढे जाऊन केंद्रात विद्युत पुरवठा विभागाची स्थापना केली आणि विद्युत संस्थांमधील लेखाजोखा संबंधीची मार्गदर्शक तत्त्व प्रणाली तयार केली. विद्युत क्षेत्र समाजातील प्रत्येक घटकासाठी उन्नतीचे कारण व्हावे, म्हणून त्याच्या सार्वजनिकीकरणासाठी विद्युत पुरवठा कायदा १९४८ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिश्रमाचे आणखी एक फळ आहे. विद्युत पुरवठा कायदा १९४८ अन्वये विविध राज्यांमध्ये विद्युत मंडळांची स्थापना झाली आणि विद्युत क्षेत्र सर्वांसाठी खुले झाले. भारतात यशस्वी औद्योगिकीकरणासाठी पुरेसा विद्युत पुरवठा परवडणाऱ्या किमतीत मिळणे अत्यंत गरजेचे आहे आणि औद्योगिकीकरणाव्दारेच गरिबी निर्मुलन होऊ शकते, असा विश्वास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होता.

***(लेखक वीजविषयक अभ्यासक आहेत.)***

# महामानवास विनम्र अभिवादन!



**वाशी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती वाशी परिमंडळाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. मनोज अधिकारी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्र.) श्री. सुभाष सोनवणे यांच्यासह अन्य अधिकारी वर्ग.



**वाशी :** महात्मा ज्योतिबा फुले यांची १९६ वी जयंती वाशी परिमंडळाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती स्वाती यंबल, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्र.) श्री. सुभाष सोनवणे यांच्यासह अन्य अधिकारी वर्ग.




**अमरावती :** अमरावती परिमंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. जयंत विके, अधीक्षक अभियंता श्री. तट्टे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे व अन्य अधिकारी.



**मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्हीजेटीआय), मुंबई यांच्या वतीने आयोजिलेल्या कार्यक्रमात महापारेषणच्या कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे यांनी सलग १८ तास अभ्यासाच्या उपक्रमात सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे चिकाटी व आत्मविश्वास बळावल्याची प्रतिक्रिया श्रीमती शिंदे यांनी नोंदवली.

## 'महापारेषण समाचार' आता डिजिटल स्वरूपात...

सोबतचा QR कोड स्कॅन करा आणि वाचा अंक







**मुंबई :** महापारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री. याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी.

## महापारेषणच्या कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, व्यवस्थापक तथा संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर, श्री. बाबासाहेब कांबळे, श्री. सुशील घाडगे उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार सांगितले. महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांच्याविषयीची माहिती सांगितली.

तसेच महाराष्ट्रातील महापारेषणच्या विविध कार्यालयात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. महेश आंबेकर यांनी मानले.

जय बसव



**मुंबई :** महापारेषणमध्ये महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, सहाय्यक व्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत व अन्य अधिकारी.

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले, ''महात्मा बसवेश्वरांनी समतेचा विचार मांडला. महात्मा बसवण्णांनी व्यवस्था परिवर्तन केले, व्यवस्थेत बदल केला. एकांताकडून-लोकांताकडे, अज्ञानाकडून- ज्ञानाकडे, दानधर्माकडून-दासोहाकडे, मंदिराकडून-अनुभवमंटपाकडे, कठोरतेकडून-सहजतेकडे, शिष्यत्वाकडून-शरणजीवनाकडे, अंधश्रध्दतेकडून विवेकवादाकडे, विषमतेकडून-समानतेकडे घेऊन जाणारी नवी व्यवस्था निर्माण करणारे बसवण्णा सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. नवा मार्ग शोधणारे ते एक पथदर्शी होते.'' कार्यक्रमास विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमच्याशी कनेक्टेड रहा

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

## ▶ प्रशासकीय परिपत्रकाच्या पुस्तकाचे प्रकाशन

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत ६३ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. भूषण बल्लाळ, श्री. पीयूष शर्मा, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, उपमुख्य सुरक्षा अधिकारी श्री. राजेश गोवळकर, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### प्रशासकीय परिपत्रकाच्या पुस्तकाचे प्रकाशन

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते महापारेषणच्या प्रशासकीय परिपत्रकाच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) म्हणाले, ``मानव संसाधन विभाग सातत्याने मेहनत घेत आहे. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामांमध्ये या पुस्तकामुळे स्पष्टता येणार आहे. कंपनीतील अन्य विभागांनीही पुढाकार घेऊन मानव संसाधन विभागांप्रमाणे नावीन्यपूर्ण काम करावे. तसेच प्रत्येक विभागाने पुस्तकरूपाने एकत्रित असे सादरीकरण करावे.`` महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे म्हणाले, ``प्रशासकीय परिपत्रकाचे एकत्रित असे एक पुस्तक आहे. या पुस्तकामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामांमध्ये सुसुत्रता व सुलभता येईल. संदर्भ म्हणून हे पुस्तक अत्यंत उपयोगी आहे. ५०१ ते ६०१ अशा एकूण १०० प्रशासकीय परिपत्रकाचे मिळून हे पुस्तक बनले आहे. मानव संसाधन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिळून हे काम सांघिक भावनेने केले आहे.``

### मानव संसाधन विभाग अग्रेसर

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले आहेत. यापूर्वी वातानुकूलित लायब्ररी व व्यायामशाळा (जिम) सुरू करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुविधा दिल्या आहेत.



**मुंबई :** महापारेषणमध्ये ६३ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



**मुंबई :** महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते महापारेषणच्या प्रशासकीय परिपत्रकाच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO for Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Jyotirling Enterprises :** 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.